'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3 July-Sept.- 2016

# लोकसंस्कृती आणि सण—उत्सव.

प्रा. विपीन नारायण वैराट
सहा. प्राध्यापक. (मराठी विभाग)
शंकरराव जगताप कॉलेज वाघोली.
ता. कोरेगाव जि. सातारा
मो. नं. ७५८८८६४५५५/९२०९३००३९५

*लोकसंस्कृती तुमच्या आमच्या जीवनातील रोजचा भाग आहे. तो परंपरेने चालत आलेला आहे समूहमनाच्या अबोल प्रेरणेतून आलेल्या रुढी, परंपरा, चालीरीती, धर्मकल्पना, सण, यात्रा, उत्सव त्यांच्याशी संबधित विविध कला, लोकगीते, कथा या सर्वांचा तो एक मोठा ठेवा आहे. जगण्याचे बळ त्यामुळे लोक मानसाला मिळते जोपर्यंत मानवी जीवन आहे तोपर्यंत लोकसंस्कृती सण उत्सवाच्या रुपाने अखंड पणे चालत राहणार आहे. हया लोकसंस्कृतीच्या अभ्यासामुळे विविध संस्कृतीचा अभ्यासाच चालना मिळावी. तसे झाले तर सांस्कृतिक वाद कमी होऊन एकमेकांच्या संस्कृती विषयक अनेक समज—गैरसमज दूर होण्यास मदत होईल.*

आजच्या काळात लोकसाहित्याच्या अभ्यासाची व्याप्ती वाढत आहे. मात्र लोकसाहित्यातील महत्त्वाचा घटक अथवा मूळ पाया असलेली लोकसंस्कृती ही संकल्पना फारशी समाज मानसात रुजलेली नाही. लोकसाहित्याला काही अभ्यासकांनी लोकसंस्कृतीचा अविष्कार मानले आहे. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असले तरी लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती नव्हे, कारण लोकसाहित्याशिवाय इतरही अनेक अविष्कारातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. हया लोकसंस्कृती आणि सण उत्सव यांचा अभ्यास करण्यापूर्वी आकलनाच्या सोयी करीता आधी 'लोक' व 'संस्कृती' हया दोन्ही शब्दांची संकल्पना जाणून घेणे गरजेचे ठरते.

'The study of folklore' या ग्रंथाचे संपादक ॲलन डेडेस यांनी लोकसाहित्य म्हणजे काय हे स्पष्ट करताना folk ची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते ''लोक म्हणजे दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तिंचा असा समूह, ज्यांच्यात वंश, भाषा, व्यवसाय किंवा धर्म यापैकी एक किंवा अधिक समान तत्वे असतात. त्यांना या तत्वाच्या किंवा या तत्वांच्या संर्दभात स्वत:ची एक अशी निराळी परंपरा असते या समूहातील व्यक्तीला त्यांच्यात असलेल्या समान तत्वांची आणि त्यासंबंधीच्या परंपराची जाणिव असते अशा समूहातील व्यक्तिंना परस्परांचा परिचय नसला तरी आपण एकच परंपरा असलेल्या समूहाचे घटक आहोत याचे भान असते या परंपरांमुळेच या समूहाला स्वत:चे असे वेगळे आणि वैशिष्टयेपूर्ण आस्तित्व लाभते''. १

या सर्वांना 'लोक' ही संज्ञा वापरता येते तर 'संस्कृती' शब्दाची व्याप्ती इतकी बहुआयामी व गुंतागुंतीची आहे की तिची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे शक्य नाही ''इमर्सनच्या शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल 'जिच्यामुळे जगावेसे वाटते, तिला संस्कृती असे म्हणतात, किंवा जीवन यात्रेची पद्धती ज्या सामाजिक आचार, विचार, श्रद्धा आणि वाङमय यामधून आभिव्यक्त होते, तिला संस्कृती म्हणायला हरकत नाही'' २ म्हणजेच माणसाची विशिष्ट जीवन पद्धती म्हणजे संस्कृती आहे. पोषाख, खाण्यापिण्याच्या पद्धती, आचार, व्यवहार, कला, साहित्य इत्यादी अनेक गोष्टींतून विशिष्ट जीवन पद्धती तयार होते, ती आपली संस्कृती आपण मानतो. तरी सूद्धा सर्वांची जीवन पद्धती समान असत नाही तिच्यामध्ये बदल करणारे अनेक घटक असतात भौगोलिक, ऐतिहासिक, वांशिक वगैरे वगैरे त्यामूळेचे संस्कृती भिन्नता निर्माण होते.

दुसरे असे ''माणूस हा भोवतालच्या निसर्गामध्ये जीवनाच्या प्रगतीला अनुकूल असे बदल करुन म्हणजे त्यावर संस्कार करुन आपले जीवन अधिक सुरक्षित, अधिक सुखमय आणि अधिक समृद्ध बनवितो. त्याबरोबरच तो स्वत:च्या मन, बुद्धी, कल्पकता यांचा अधिक चांगला वापर करतो. त्यांच्या वरही संस्कार करतो. या साऱ्यांना स्थूलपणे संस्कृती म्हणता येईल. द्रविड, असुर, निषाद, किरात हूण, पल्लव, मुंड, तोड, भिल्ल, ठाकूर, नाग, वारली, चेचू यांच्या ज्या चालिरिती, त्यांचा परिपाक लोकसंस्कृती झाला'' ३
म्हणजे लोकसंस्कृतीमध्ये या अनेक जातीजमातींमधले अनेक रितीरिवाज आणि संस्कृती विशेषांचा समावेश नकळत झाला. मानव समूहातील कला, क्रीडा, लोकरुढी, लोकभ्रम, लोकदैवत, लोकधर्म या सर्वांचा समावेश लोकसंस्कृती मध्ये होत असतो. हे सर्व घटक लोकसंस्कृतीचे घटक आहेत.

भारतीय समाज जीवनात लोकसंस्कृतीचा अविष्कार सण–वार, चालीरीती, प्रतिकपूजा, निसर्गपूजा, जत्रा–यात्रा, उत्सव इत्यादीतून होत असतो. म्हणून लोकसंस्कृती आणि सण उत्सव यांचे संबंध आपण पाहणार आहोत. हया दोन्ही घटकांचे परस्पर संबध लोकसंकृतीच्या विशेषांमध्ये, स्वरुपामध्ये आढळते. ते पाहू या.

लोकसंस्कृतीच्या बाबतीत विचार करीत असताना निसर्गाचा फार मोठा सहयोग दिसून येतो. निसर्गाच्या सानिध्यातच, त्याच्या सहवासात, त्याचा आधार घेतच, अनुकरण करीत लोकमानस तयार होत असते. निसर्गाच्या इच्छेनूसार मानवाला जगायला लागते. त्यामुळे लोकसंस्कृतीतल्या व्यक्तीला निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण असते. दूसरे असे भुमीशी असलेले दृढ नाते हे लोकसंस्कृती वैशिष्टये ठरते. अन्नधान्य भूमीतून पिकवितो. त्यामुळे आपण जीवन जगतो ही भावना भूमी विषयी आदर, प्रेम, श्रद्धा निर्माण करते. भूदेवी, भूमाता त्यामूळे तो मानतो. ''ती त्याच्या दृष्टीने सर्जन, सुफलीकरण, संरक्षण आणि समृद्धी यांची अधिष्ठात्री देवता असते''४ हया भूमीच्या आशीर्वादाने आपली उपजिविका होते. म्हणून सरत्या आषाढातल्या चार दिवसांत भूमी नांगरट करीत नाही. नवरात्रात घटस्थापना करुन सर्जनशीलतेची पूजा करतो. घरबांधणी करते वेळी पाया खणताना क्षमा मागतो. पूजा करतो श्रद्धेपोठी भूमी विषयक गोष्टी लोकसंस्कृतीत केल्या जातात.

RESEARCH JOURNEY

भूमी आणि स्त्री यांच्याकडे एकत्वाच्या भावनेने पहिले जाते. सर्जनशीलतेचे प्रतिक म्हणून भूमीकडे पाहिले जाते. तसेच स्त्रीकडे देखिल पाहिले जाते म्हणून भूमीच्या सुफलीकरणाचे पुरुषत्व मानलेल्या पावसाच्या करावयाच्या विधीमध्ये 'स्त्री' ला मानाचे स्थान आहे.

लोकसंस्कृती मध्ये धार्मिक विधींना महत्त्व आहे. कारण लोकसंस्कृती परंपरा अधिक मानते. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रुढी, परंपरा, संकेत निरर्थक असले तरी त्याच्या पालनाची गरज लोकसंस्कृतीमध्ये महत्वपूर्ण ठरते. उदा. – शनीच्या मंदिरात स्त्रियांनी प्रवेश करु नये, पूजा करु नये, अरिष्ट कोसळते याला कसलाही आधार नाही. पण धारणा आहे. तीन वाटेवरची चिमूटभर माती व मीठ उतरुन टाकल्याने बाळाचा ताप कमी होतो. बाहेर गावाहून आलेल्या लेकीवर भाकरीचा तुकडा, तांब्याभर पाणी ओवाळून टाकल्याशिवाय तिला घरात घेतले जात नाही कारण, तिच्या मागोमाग येणारी भूतबाधा त्याशिवाय टळत नाही. कित्येकदा हे विधी कृतज्ञतेतून निर्माण होताना दिसतात. जसे की, जमिन, भूमाता आपल्या धनधान्य देते म्हणून तिचे उपकार फेडणारे विधी आपल्याला लोकसंस्कृतीत आढळतात. ऊन पावसात आपल्याबरोबर शेतात राबतो त्या बैलाची पूजा बेंदरादिवशी करतो. ऋणातून उतराई होणे हाच यामागील निश्‍चित हेतू जाणवतो. मौखिक परंपरा, प्रतिमा, प्रतिकांतून आणि मिथक कथेतून प्रकट होण्याचा तिचा स्वभाव तिच्यात आढळणारे पूरातन तत्वाचे अवशेष यांसारखी काही वैशिष्ट्ये लोकसंस्कृतीचे वेगळेपण सिद्ध करते.

हया लोकसंस्कृतीतील अवशेष सण उत्सवांमध्ये पाहायला मिळतात. तिचा अविष्कार वर्षानुवर्ष सण उत्सवातून होत आलेला आहे. नागपंचमीला आपल्याकडे नागाची पूजा केली जाते. जिथे वारुळ असेल तिथ जाऊन त्या वारुळात दूध, लाहया वाहिल्या जातात. नागासाठी म्हणून तो नैवेद्य दिला जातो. याच्यामागे सूद्धा लोकसंस्कृतीतील काही तत्व पाहायला मिळतात. निसर्गातील गूढ आणि अमोल शक्तीप्रमाणे काही प्राण्यांच्यामध्ये प्रचंड शक्तीचा पसारा पाहून आदिमानव दिपून गेला असणार. जसे की वाघ, सिंह, हत्ती, बैल, साप या प्राण्यांपुढे आपली ताकद कमी, तेव्हा त्यांना पूजने सुरु झाले. साप क्षणात दिसतो त्याची ती चपळता, त्याची ती चकाकी त्यांचा एक दंश केला की, माणूस प्राणी पाणी देखिल मागत नाही क्षणात काळा निळा होऊन पडतो. साक्षात मृत्यू आणि म्हणून यागोष्टीची कारणमीमांसा न करु शकणारा मानव त्याची पूजा करु लागला. सापाचा पूजक बनला. प्राचीन भारतीयांनी त्याल दैवत्व बहाल केले, एवढेच नव्हे तर पृथ्वीच्या पाठीवर नानाविविध देश आहेत अन समुदाय जिथे नागाला पूजले जाते. ''जपानमध्ये सर्प देवतेला संतान देणारी देवता म्हणून पूजिले जाते. तेथेही नागपूजा पूर्वीपासून प्रचलित आहे. कोरियात सापाला श्रद्धापूर्वक खाऊ घालणे व त्याची पूजा करण्याची प्रथा आढळते. रोम शहरात वर्षातल्या एका दिवशी हेराच्या मंदिरात तेथल्या बालिका सापाला केक अर्पण करतात.... नेपाळ आणि तिबेट मधील लोकांची ही नागपूजेवर श्रद्धा आहे.'' ५

होळी सणाविषयीची पार्श्वभूमी आपल्याकडे ज्या काही पूराणात कथा आढळतात. त्या केवळ धार्मिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्यासाठीच्या असाव्यात. जसे की हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद यांची कथा. खरे होळीच्या जागेचे आधी पूजन केले जाते मग सुकलेल्या वस्तू ठेवल्या जातात. यक्ष म्हणून एरंडाचा सोट मध्यभागी उभा करतात. तो पेटविल्यावर अक्षता गंध फुले अर्पण करतात. नवैद्य दाखवतात. काही ठिकाणी 'बोंब' देखिल मारली जाते. अग्नी सुरु झाल्यावर. वास्तविक रावणाचा वध वाईट प्रवृत्तीचा नाश ही परंपरा सांगितली जात असली तरी जगातल्या सर्व देशांमध्ये अदिमानव अगदी सुरुवातीपासून अग्नी पूजा करताना दिसतो. याचे कारण अग्नी महती व उपयुक्तता हेच होय. अग्नीमुळे हिंस्त्र श्वापद आपल्या जवळ येत नाही त्यांच्यापासून आपला बचाव होतो. अग्नीपासून ऊब मिळते. थंडीपासून संरक्षण होते. फिर रात्रीतही प्रकाश मिळतो. अग्नीवर भाजलेल्या मांसाला अधिक चांगली चव येते. हे आदिमानवाला ठाऊक झाले. आणि अग्नीविषयीचा कृतज्ञता प्रकट करण्यासाठी त्याने 'होलिकोत्सव' हा सण सुरु केला. '' स्वीडन, जपान, पोलंड, जर्मनी, मॉरिशस, चीन, इराण, तिबेट या देशांमध्येही अग्नीची पूजा करण्यासाठी होळीचा सण साजरा केला जातो'' ६

आपल्या संस्कृतीमधील आणखी एक चैतन्याचा सोहळा म्हणजे दीपावली होय. चार–पाच दिवसांचा साजरा होणारा हा सण विविध वैशिष्टयांनी सजलेला दिसतो. हया सणाला तेजाची पूजा होते, धनाची पूजा होते, पशू व भूमीची पूजा देखिल केली जाते. हा सण प्राचीन काळापासून प्रचलित आहे काहीच्या मते चौदा वर्षाचा वनवास संपवून श्रीराम सीतेसह अयोध्येला आला तो हा दिवस. रामाच्या आगमनाप्रित्यर्थ प्रजेने दीपोत्सव साजरा केला तर काहीच्या मते अशोकाच्या दिग्विजयाप्रीत्यर्थ हा सण सुरु झाला. या लोकमानसाबरोबरच बळीने वामनाला तीन पावले टाकण्याचा वर दिला. वामनाने दोन पावलामध्येच स्वर्ग व पृथ्वी व्यापून टाकली व तिसरे पाऊल बळीच्या मस्तकी ठेवून त्याला पाताळात दाडपले. ही घटना घडली अश्विन वद्य त्रयोदशी तो अमावस्याचा दिवस होता. त्यावेळी बळीने प्रजेच्यासाठी सामान्य लोकांच्या सुखी जीवनासाठी वामनाकडे प्रार्थना केली म्हणून प्रतिपदेला दीपदान केले जाते. बळीचा दिवस म्हणून आनंदोत्सव केला जातो. यात कालमानाप्रमाणे वेगवेगळया धार्मिक विधींचा कळत नकळत समावेश होत गेला. जसे की, लक्ष्मीचे पूजन असो अथवा व्यापारी

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

मंडळाकडून त्यांच्या हिशोबी वहीचे पूजन असो किंवा पाडव्याचे पत्नीने करावयाचे पतीचे पूजन असो. खरे तर हा सण कृषी जीवनाशी निगडीत असल्याने आपल्या शेतात राबणाऱ्या पशूधनाचे भरघोस आलेल्या कृषी धनाचे पूजनाचा उत्सव होय.'वसुबारस' पासून बलिप्रतिपदेपर्यंत, नरक चर्तुदशी ते लक्ष्मीपूजन वेळी विविध विधींमध्ये कृषीसंस्कृती संलग्न असल्याचे जाणवते. ''याच दिवशी गोवर्धनाची पूजा करण्याची प्रथा आहे. त्यासाठी शेणाचा पर्वत करुन त्यावर दूर्वा फुले खोचतात. कृष्ण गोपाळ, गाई–वासरे यांची चित्रे मांडून त्यांची पूजा करतात. राजस्थानमध्ये या निमित्ताने बैलांना घेऊन गाणी म्हणत शेतकरी घरोघरी जातात. तर उत्तर प्रदेशात गायींची पूजा केल्यावर गावाच्या सीमेवर मशालीच्या प्रकाशात नृत्य करतात, आंध्रामध्ये बळीची प्रतिमा पूजल्यावर कालवडीची मिरवणूक काढतात, तर नगर जिल्हयात बळीची अश्वारुढ प्रतिमा तयार करुन त्याच्याभोवती एकवीस दिवे मांडण्याची प्रथा आहे ''. ७

समारोप :– लोकसंस्कृती तुमच्या आमच्या जीवनातील रोजचा भाग आहे. तो परंपरेने चालत आलेला आहे समूहमनाच्या अबोल प्रेरणेतून आलेल्या रुढी, परंपरा, चालीरिती, धर्मकल्पना, सण, यात्रा, उत्सव त्यांच्याशी संबधित विविध कला, लोकगीते, कथा या सर्वांचा तो एक मोठा ठेवा आहे. जगण्याचे बळ त्यामुळे लोक मानसाला मिळते जोपर्यंत मानवी जीवन आहे तोपर्यंत लोकसंस्कृती सण उत्सवाच्या रुपाने अखंड पणे चालत राहणार आहे. हया लोकसंस्कृतीच्या अभ्यासामुळे विविध संस्कृतीचा अभ्यासाच चालना मिळावी. तसे झाले तर सांस्कृतिक वाद कमी होऊन एकमेकांच्या संस्कृती विषयक अनेक समज–गैरसमज दूर होण्यास मदत होईल.

## संदर्भ –

१. लोकसाहित्याचे स्वरुप – प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद पृष्ठ क्र.३.
२. लोकसंस्कृती स्वरुप आणि विशेष – डॉ. द.ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन प्रथमावृत्ती २००४, पुणे–४११०३२ पृष्ठ ११.
३. लोकसंस्कृती स्वरुप आणि विशेष – तत्रैव पृष्ठ १३.
४. लोकसंस्कृती बंध – अनुबंध – द.ता.भोसले. पद्मगंधा प्रकाशन प्रथमावृत्ती – २०१०, पुणे पृष्ठ १५.
५. लोकसंस्कृती स्वरुप आणि विशेष – तत्रैव पृ. ६३.
६. लोकसंस्कृती स्वरुप आणि विशेष – तत्रैव पृ. १२८.
७. संस्कृतीच्या पाऊलखुणा – द.ता.भोसले पद्मगंधा प्रकाशन २००४, पुणे व्दितीयावृत्ती पृष्ठ ३३.